# भारतीय लोकशाहीचा सातत्यपूर्ण विकास

**रवींद्र भणगे** राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर

---

**प्रस्तावना** :

भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. या व्यवस्थेचे जगभरात महत्त्व आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था ही लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन करते. इथे सार्वत्रिक निवडणुका, प्रौढ मतदान, मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि कार्यकारीमंडळ, कायदे मंडळ आणि न्यायमंडळ यांचे स्वातंत्र्य अबाधित आहे. आपली लोकशाही व्यवस्था सामाजिक न्याय आणि समानतेला प्रोत्साहन देते. इथे सर्व नागरिकांना समान अधिकार आणि संधी यांची तरतूद आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेने देशाच्या विकासात महत्त्व भूमिका बजावली आहे. जगभरातील विचारवंतांच्या मते भारतीय लोकशाही व्यवस्था ही जगासमोर आदर्श निर्माण करणारी आहे . भारताच्या लोकशाहीचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीपासून सुरू होतो. प्राचीन भारतात अनेक लोकशाही तत्त्वे आणि संस्था अस्तित्वात होत्या. लोकशाहीच्या या प्राचीन परंपरेमुळेच भारताला लोकशाहीची जननी मानले जाते.

**भारतीय लोकशाहीचा उदय व विकास :**

प्राचीन काळापासून आजपर्यंत भारत लोकशाही तत्त्वे आणि लोकशाही संस्थांनी आकाराला आला आहे. त्याच तत्वे व संस्थानी भारताच्या प्रगतीचा आणि सर्वसमावेशकतेचा पाया घातला आहे.भारतातील लोकशाही तत्त्वे आणि परंपरांचे सर्वात जुने स्त्रोत म्हणजे सिंधू संस्कृती, ऋग्वेदीक काळखंड, महाजन पदांचा काळखंड, संगम कालखंड होय. नंतर उत्तरमेरू आणि अनुभवमंडपाची उदाहरणे भारताच्या समृद्ध लोकशाही परंपरेचे पुरावे आहेत,ज्यात सर्वसमावेशक शासन, सहभागात्मक निर्णय घेणे आणि संवादाच्या सामर्थ्यावर जोर देण्यात आला आहे. या ऐतिहासिक उदाहरणांचा आणि त्यांच्या परिणामांचा शोध घेतल्यास,भारताच्या लोकशाही परंपरेचा वारसा उलगडत जातो जो आजही देशाच्या वाटचालीला सतत मार्गदर्शन करत आहे. महाभारत, पाणिनीची अष्टाध्यायी आणि बौद्ध धर्मग्रंथांमधील “गण” आणि “संघ” अशा संकल्पनांच्या उल्लेखांतून भारताचा लोकशाही वारसा त्याच्या प्राचीन इतिहासामध्ये स्पष्टपणे दिसतो.

सिंधू संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन संस्कृती मानली जाते. या संस्कृतीतील नगरराज्यांमध्ये लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होते. त्यावेळी लोकशाही मूल्यांना अनुसरून राजकीय संस्था निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. आपल्या नगरासमोरील प्रश्न सोडवण्यासाठी लोक एकत्रित येवून चर्चा करत असत व आपल्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला निर्णय घेण्याचे अधिकार सुपूर्द करत असत.सिंधु संस्कृती मध्ये स्त्री- पुरुष समतेचे तत्त्व मान्य केल्याचे दिसते. व्यक्तीला आपले मत खुलेपणाने मांडण्याचा अधिकार होता यावरून असे दिसते की व्यक्तीस्वातंत्र्याच्या मूल्याची रुजुवात या काळात केली गेली.

ऋग्वेदकालीन भारतातही लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होती. या काळात पंचायती व्यवस्था ही एक लोकशाही संस्था होती. पंचायती व्यवस्था ही गावातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती.वेदीक काळामध्ये सभा,समिती अशा राजकीय संस्था अस्तित्वात होत्या जिथे लोक एकत्र येवून राजकीय निर्णय करत असत. याच सभा,समिती च्या माध्यमातून राजा ची निवड केली जात असे . या व्यवस्थेच्या माध्यमातून कर यंत्रणा राबविली जात असे. गावचे रक्षण करण्यासाठी राजाला कररूपी मोबदला दिला जात असे त्याला ‘बली’ म्हंटले जात. यावरून असे लक्षात येते की आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये असणारी वैशिष्टे ही तत्कालीन राजकीय व्यवस्थेमध्ये प्राथमिक अवस्थेत आकाराला येत असल्याचे दिसते.

बुद्ध काळामध्ये महाजनपदे व गणराज्ये अस्तित्वात आल्याचे दिसते. बुद्धकालीन राजकीय व्यवस्थेमद्धे आजच्या आधुनिक लोकशाहीतील मूल्यांचा उद्गम शोधता येतो. त्यावेळी 16 महाजन पदे व 10 गणराज्ये अस्तित्वात आली होती. गणराज्यामध्ये राजाची निवड ही वंश परंपरागत पद्धतीने न होता लोकांकडून राजा निवडून राज्यकारभार केला जात होता. बुद्धकालीन गणराज्य व्यवस्थेचे वर्णन डॉ.अमर्त्य सेन यांनी ‘चर्चात्मक लोकशाही’ असे केले आहे.यावरून असे म्हणता येईल की आजच्या भारतीय लोकशाहीच्या प्रेरणा प्राचीन काळापासून अस्तित्वात होत्या. या प्राचीन लोकशाही व्यवस्थेत भारतातील सहभागात्मक शासन, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग, सामूहिक शहाणपणाचे तत्त्व आणि विचार मांडण्याचे स्वातंत्र्य ही लोकशाही मूल्ये अस्तित्वात होती.

**भारतातील आधुनिक लोकशाहीचा विकास :** ब्रिटिश राजवटीपासून भारतात लोकशाहीला पुन्हा चालना मिळाली. ब्रिटिशांनी भारतात निवडणुका, न्यायव्यवस्था आणि मूलभूत अधिकार यांसारख्या इतर लोकशाही संस्थांची आणि

संकल्पनांची पुनर्रस्थापना केली. आधुनिक भारतीय लोकशाही व्यवस्थेची रुजुवात होण्यासाठी विशेषत: 1773 सालच्या रेग्युलेटिंग कायद्या पासून सुरुवात झाली असे म्हणता येईल. या कायद्यान्वये बंगालचा गव्हर्नर हा गव्हर्नर जनरल झाला व त्यास सहाय्य करण्यासाठी चार सदस्यीय कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले आणि याचेच रूपांतर आधुनिक लोकशाहीतील मंत्रिमंडळ नावाच्या मोठ्या राजकीय व्यवस्थेत झाल्याचे आपल्याला दिसते. त्याचबरोबर याच कायद्यान्वये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करून आधुनिक न्याय मंडळाची पाया भरणी केली गेली.त्यानंतर आलेल्या विविध कायद्यांच्या द्वारे विविध लोकशाही संस्था,राजकीय व्यवस्था,निवडणुकीचे तत्व, नागरी सेवा,संघराज्यात्मक व्यवस्था, मताधिकार, कायदामंडळे अशा विविध आधुनिक लोकशाही संस्था व मूल्ये निर्माण केली गेली. ब्रिटिश काळामध्ये घडलेल्या लोकशाहीसाठीचे पुनर्रप्रयत्न व सुधारणा या प्रामुख्याने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक पार्श्वभूमीतून घडल्या आहेत. पुढे भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या संस्कारातूनच आधुनिक भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने स्थापन होण्यास सुरुवात झाली.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम भारतीय घटनापरिषदेची स्थापना करून लोकशाहीत अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या सर्वसमावेशक राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. भारताची वाटचाल ही लोकशाहीच्या कोण- कोणत्या मूल्याच्या आधारे होईल ही भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्पष्ट केले गेले व आजच्या सार्वभौम, लोकशाही, गणराज्य, धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाही देशाचा पाया रचला गेला.

**भारतीय लोकशाहीची रचना व वैशिष्ट्ये**

1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय लोकशाहीची वाटचाल सुरु झाली.भारतीय लोकशाही ही भारताच्या प्राचीन परंपरांचा वारसा,जागतिक लोकशाहीचे अनुभव, संमिश्र संस्कृती, सह अस्तित्व अशा मूल्यांच्या आधारे आकाराला आली आहे. भारतीय लोकशाही मध्ये राज्यघटनेच्या आधारे निर्माण केलेल्या संस्था, संकल्पना, मूल्ये यांना अतिशय महत्व आहे. भारताने उपलब्ध लोकशाही व्यवस्थेच्या पर्यायांपैकी भारताच्या दृष्टिकोनातून योग्य व समर्पक संघराज्यात्मक संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला.

जगभरातील विचारवंत ही भारतीय लोकशाही व्यवस्थे बद्दल आस्था बाळगून असतात.भारतीय लोकशाही बद्दल काही विचारवंतांचे मत जाणून घेऊ ;

**डॉ. अमर्त्य सेन**, "भारतीय लोकशाही ही एक अशी यशस्वी प्रयोगशाळा आहे जी जगभरातील लोकाना प्रेरणा देते."

**जॉन एफ केनेडी**, " भारतीय लोकशाही ही जगातील सदृढ व आदर्श व्यवस्था आहे."

**मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर** , " भारतीय लोकशाहीचे उदाहरण पाहून इतर देशही लोकशाहीकडे वळतील."

**भारतीय लोकशाहीची रचना :**

**संघराज्य शासन व्यवस्था:-**

संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे. भारतामध्ये केंद्र व राज्य अक्षय दोन स्वायत्त शासन यंत्रणा निर्माण करण्यात आल्या.भारतीय संघराज्य व्यवस्थेमध्ये अमेरिकेप्रमाणे राज्याना पूर्ण स्वायत्तता बहाल करण्यात आली नाही. अमेरिकेमध्ये राज्यांना शेषाधिकार देण्यात आले आहेत. राज्यशास्त्राचे अभ्यासक के. सी. वियर यांच्या मते भारतीय संघराज्य हे 'अर्ध संघराज्य' आहे कारण भारतामध्ये शेषाधिकार हे केंद्र शासनाकडे देण्यात आले आहेत. भारतीय संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्र व राज्य यांच्या अधिकारांचे वर्गीकरण करून कार्यक्षेत्र निश्चिती केली जाते. केंद्रासाठी केंद्र सूची,राज्यासाठी राज्यसूची व समवर्ती सूची ज्यामध्ये केंद्र व राज्य दोघेही कायदे करू शकतात.

**संसदीय लोकशाही व्यवस्था :-**

भारताने संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतासारख्या खंडप्राय व विविधतेने समृद्ध अशा देशात सर्वांचे प्रतिनिधित्व राज्यकारभारात असणे आवश्यक होते. त्यामुळे भारतीय राज्यघटनेमध्ये संसदीय लोकशाही व्यवस्थेचे अवलंब करण्यात आले.संसदीय लोकशाहीत प्रामुख्याने एकगृही किंवा द्विगृही कायदेमंडळ अस्तित्वात असतात. भारतीय लोकशाही मध्ये संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे द्विगृही कायदेमंडळ स्वीकारण्यात आले. राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभा यांना मिळून भारतीय संसद तयार होते. त्यातील वरिष्ठ सभागृहास 'राज्यसभा' व कनिष्ठ सभागृहास 'लोकसभा' असे संबोधले जाते. राज्यसभा हे सभागृह राज्यांचे प्रतिनिधित्व करते व लोकसभेमध्ये जनतेचे प्रतिनिधि निवडून आलेले असते. राज्यसभा कधीही विसर्जित होत नाही त्यामुळे त्यास स्थायी सभागृह असे म्हंटले जाते परंतु राज्यसभेवर निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो तर लोकसभा हे सभागृह दर पाच वर्षानी विसर्जित होते व नव्याने निवडणूक होऊन सदस्यांची निवड केली जाते.

**संसदीय लोकशाहीची वैशिष्टये :**

आज जगातील अनेक देशांमध्ये संसदीय लोकशाही शासनव्यवस्था दिसत असली, तरी देशपरत्वे या व्यवस्थेचे स्वरूप आणि कार्यपद्धतीत फरक आहे. तिची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

**राज्यप्रमुख आणि शासनप्रमुख यांत फरक :**

इंग्लंडमध्ये ' राजा ' हा राज्याचा प्रमुख असला, तरी शासनव्यवस्थेचे प्रमुखत्व पंतप्रधानांकडे आहे. सर्व कारभार राजाच्या नावाने पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली त्यांचे मंत्रिमंडळ करीत असते. प्रौढ मतदानपद्धतीने (इंग्लंडसारख्या) व सापेक्ष बहुमताने (ही मतदानपद्धत संविधानाने ठरविलेली नसून कायदयाने ठरविलेली आहे) निवडून आलेले प्रतिनिधी असलेल्या सभागृहास (संसदेस) मंत्रिमंडळ जबाबदार राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. या अर्थाने पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी खरे सत्ताधीश असतात, तर राजाचे स्थान नाममात्र प्रमुख असे आहे. काही देशांमध्ये नाममात्र प्रमुख पद ' अध्यक्ष', ' राष्ट्रपती ' किंवा तत्सम व्यक्तीकडे असते परंतु पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ (कार्यकारी मंडळ) हेच खरे सत्ताधारी असतात. भारतात संविधानाने राष्ट्रपतीस अनेक अधिकार दिले असले, तरी प्रत्यक्षात ते अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळ वापरील, हे त्यात अनुस्यूत आहे. शिवाय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार हे अधिकार वापरले जातील, असा स्पष्ट उल्लेख संविधानात आहे.

**विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांची घनिष्ठता:**

संसदीय लोकशाहीत विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचे संबंध अत्यंत घनिष्ठ आणि अन्योन्य स्वरूपाचे असतात. विधिमंडळात म्हणजे कनिष्ठगृहात बहुमत असणाऱ्या पक्षाचा किंवा पक्षांच्या युतीचा नेता पंतप्रधान बनतो व आपले सहकारी निवडतो. धोरण ठरविण्यात आणि ते अंमलात आणण्यात तो मंत्रिमंडळाचे व संसदेचे (प्रतिनिधिगृहाचे) नेतृत्व करतो. पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी हे विधिमंडळाचे सदस्य असणे अनिवार्य असते. जोपर्यंत बहुमताचा पाठिंबा असतो, तोपर्यंत पंतप्रधान अधिकार पदावर राहू शकतो. या अर्थाने तो आणि त्याचे मंत्रिमंडळ विधिमंडळाला जबाबदार असते परंतु काही वेळा राजकीय कारणांनी किंवा विशेष परिस्थितीत विधिमंडळाची निर्धारित मुदत संपण्याअगोदर पंतप्रधानाने शिफारस केल्यास विधिमंडळ बरखास्त केले जाऊ शकते. म्हणजे जसे, पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळाचे अस्तित्व विधिमंडळाच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. त्याप्रमाणे काही वेळा विधिमंडळाचे अस्तित्वही पंतप्रधानांच्या निर्णयावर अवलंबून असते. या अर्थाने त्यांचे संबंध अन्योन्य आहेत. संसदीय लोकशाहीतील विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळातील सत्ताविभाजन अध्यक्षीय लोकशाहीप्रमाणे अत्यंत काटेकोर असे नसते.

**संसदेची सर्वोच्चता :**

इंग्लंडमध्ये संसदेचे सार्वभौमत्व मानलेले आहे. गेल्या सातशे वर्षांपेक्षा अधिक काळात विकसित होत गेलेल्या या पद्धतीत, सत्ता राजाकडून लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संसदेकडे आली. राजाचे स्थान नाममात्र राहिले. त्यामुळे बहुमताने ठराव करून किंवा कायदा करून संसद राजकीय क्षेत्रात काहीही करू शकते, अशी एक धारणा आहे. संसदेने केलेल्या कृत्याला आव्हान देता येत नाही. या अर्थाने संसद सार्वभौम असल्याचे मानले आहे परंतु काही विचारवंतांच्या मते संसदेचे सार्वभौमत्व हा एक भ्रम आहे. इंग्लंडचा अपवाद सोडल्यास अन्य सर्व देशांमध्ये लिखित संविधानाव्दारे संसदेचे गठन होते. त्यामुळे संसद ही संविधानाची निर्मिती ठरते. संसदेला संविधानाच्या चौकटीतच कार्य करता येते. या ठिकाणी संविधान सर्वोच्च ठरते आणि संसद त्याची निर्मिती ठरते. ही दोन्ही मते संबंधित राष्ट्रांच्या संदर्भात संयुक्तिक असली, तरी ठरलेल्या चौकटीत संसदेचे स्थान आणि महत्त्व अन्य संस्थांच्या तुलनेत महत्त्वाचे आहे.

संसदीय लोकशाहीत वरील वैशिष्टये असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात या कार्यपद्धतीच्या वास्तव स्वरूपात देशपरत्वे फरक पडलेला आढळतो. इंग्लंडमधील संसदीय लोकशाही द्विपक्षीय स्वरूपाची आहे. तेथे संमिश्र सरकार हे अपवादात्मक स्थितीत अधिकारावर येते, तर अन्य यूरोपियन देशांत संमिश्र सरकारे आणि बहुपक्षपद्धती आढळते. भारतासारख्या देशात प्रारंभी एकपक्ष प्रबल पद्धतीच्या प्रभावाखाली संसदीय लोकशाही स्थिर झाली, तर आता बहुपक्ष पद्धती आणि केंद्र व राज्य स्तरावर विभिन्न पक्ष, पक्ष गट यांची पक्षीय किंवा संमिश्र सरकारे अधिकारावर येत असलेली दिसतात. निर्वाचन पद्धती, नोकर भरती, शासकीय कर्मचाऱ्यांची राजकीय तटस्थता, मध्यवर्ती सत्ता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील संबंध किंवा संघराज्यव्यवस्थेतील केंद्र आणि राज्य यांतील संबंध यांबाबत आपल्याला वास्तवात संसदीय लोकशाहीचे संकेत, परंपरा, कार्यपद्धती आणि कार्यक्षमता याबद्दल जगभर विविधता दिसून येते.

**स्वतंत्र न्यायमंडळ :-**

भारतीय लोकशाही मध्ये स्वतंत्र न्यायमंडळाची स्थापना करण्यात आली. भारतीय राज्यघटनेने सत्ता विभाजनाचे सिद्धांत स्वीकारले आहे. त्यामध्ये कायदे करण्याचे अधिकार कायदेमंडळास , कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास व कायद्यांचा अर्थ लावण्याचा अधिकार न्याय मंडळास देण्यात आला आहे. त्यानुसार स्वतंत्र न्याय मंडळाची रचना करण्यात आली आहे . भारतीय न्यायमंडळ ही एकेरी स्वरूपाचे आहे. त्यामध्ये सर्वोच्च स्थानी भारताचे सर्वोच्च न्यायालय आहे त्यानंतर राज्यांमधील उच्च न्यायालये , जिल्हा न्यायालय व इतर कनिष्ट न्यायालये अशी श्रेणीबद्ध रचना करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय हे सर्व भारतामध्ये सर्वच न्यायालयाना बंधनकारक असतात.उच्च न्यायालयांचे कार्यक्षेत्र संबंधित राज्यापुरते मर्यादित असते तर जिल्हा न्यायालये व कनिष्ठ न्यायालये त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते न्याय निर्धारणाचे कार्य करतात.

**स्वायत्त केंद्रीय निवडणूक आयोग व इतर घटनात्मक संस्था :**

कोणत्याही लोकशाहीमध्ये सार्वत्रिक निवडणूक अतिशय महत्वाची असते. लोकशाही मध्ये सरकार निवडण्याचे अधिकार नागरिकांना जरी असले तरी त्या अधिकाराचा वापर नागरिक फक्त निवडणुकीच्या माध्यमातून करू शकतात. त्यामुळे लोकशाही मध्ये पारदर्शक निवडणूक अत्यंत महत्वाचे असतात. लोकशाही सक्रिय व प्रभावी ठेवण्याचे काम निवडणुकांच्या माध्यमातून नागरिक करत असतात. अशा निवडणूक घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना करून तयार करण्यात आली आहे. त्याचबरोबर लोकशाही मध्ये नागरिकांचे विविध अधिकार जपण्यासाठी , विकासात्मक धोरण ठरविण्यासाठी इतरही विविध संस्थांची स्वतंत्र निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये केंद्रीय वित्त आयोग , लोकसेवा आयोग , नीती आयोग , लोकपाल , नियंत्रक व महालेखापाल अशा विविध संस्थात्मक संघटना निर्माण करण्यात आल्या आहेत . सर्व संस्था भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी कार्यरत आहेत. लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी सर्वच घटकांनी जागृतपणे योगदान देणे आवश्यक आहे.

**भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :**

लोकशाही ही एक सजीव पणे चालणारी प्रक्रिया आहे. लोकशाहीचा स्वीकार केला म्हणजे लोकशाही अस्तित्त्वात राहील असे होत नाही.त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते, जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. लोकशाहीला असणारे धोके वेळीच ओळखून त्यांचे लोकशाहीच्या मार्गानेच निराकरण करणे आवश्यक असते. प्रस्तुत मुद्द्यामद्धे आपण भारतीय लोकशाहीसमोर कोणती आव्हाने आहेत याचा प्रामुख्याने विचार आढावा घेणार आहोत.

तत्पूर्वी जागतिक पातळीवर लोकशाहीसमोरील आव्हानांचा आपण थोडक्यात विचार करू. आज जगातला प्रत्येक देश आपण लोकशाहीवादी असल्याचे म्हणतो. परंतु प्रत्यक्षात मात्र लोकांचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी आणि जनकल्याणाला प्राधान्य देणारी लोकशाही फारच थोड्या देशांमध्ये आहे. लष्करी राजवटींचा मोठा धोका लोकशाहीसमोर आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर खऱ्या लोकशाहीचा प्रसार होणे व प्रत्येक देशात तिचा अवलंब हे लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. लोकशाही प्रसाराचे हे जागतिक पातळीवरील आव्हान आहे. ज्या देशांमध्ये लोकशाही रुजली आहे असे आपण म्हणतो तेथेही लोकशाहीचा वावर मर्यादितच आहे. अन्य देशांमध्येही लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय इत्यादींचा बोध होतो. परंतु हे लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आहे. लोकशाही जर एक जीवनमार्ग व्हायचा असेल तर लोकशाही समाजाच्य विभिन्न क्षेत्रांत पोहचली पाहिजे. सर्व समाज घटकांचे सामीलीकरण, सामाजिक संस्थांना स्वायत्तता, नागरिकांचे सक्षमीकरण, मानवी मूल्यांचे जतन इत्यादी मार्ग त्यासाठी अवलंबावे लागतील.

खरी लोकशाही रुजवण्याचे हे कार्य पूर्ण होण्याची गरज आहे. लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे हे जगातल्या सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय, शांतता, विकास आणि मानवतावाद ही मूल्ये समाजाच्या सर्व स्तरांवर नेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक व्यापक सहमतीही पुन्हा लोकशाही मार्गानेच निर्माण करता येणे शक्य आहे. लोकशाही खोलवर नेण्यासाठी या सुधारणांची आवश्यकता आहे. उदारमतवादी लोकशाही संकल्पनेने औद्योगिक व विकसित अशा समाजात राजकीय व आर्थिक स्थैर्य निर्माण केलेले आहे. त्यामूळे विकसनशील व नवोदित देशांतही लोकशाही पद्धतीविषयी आकर्षण निर्माण झालेले आहे. आंतरराष्ट्रीय समाजात स्थान आणि प्रतिष्ठा मिळण्याच्या दृष्टिने सामान्य लोकांबरोबर नवोदित राज्यांनाही लोकशाहीचे महत्व वाटू लागलेले आहे. लोकशाही अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व नागरीकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी

करून घेणे आवश्यक आहे.लोकशाहीच्या अंतर्भूत मर्यादा व सामाजिक राजकीय परिस्थितीतून काही आव्हाने निर्माण झाली आहेत. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने खालीलप्रमाणे सांगता येतील.

**जमातवाद :**

भारतीय लोकशाही मध्ये धार्मिक कट्टरता जमातवादाच्या रूपात एक मोठे आव्हान आहे. कोणत्याही लोकशाही मध्ये जमतवादी प्रवृत्ती ही लोकशाहीच्या विकासाला व कालांतराने अस्तित्वाला धोका निर्माण करणारी असते. जमातवादामध्ये 'आपले आणि परके' असा 'इतरीकरणाचा' भाव जन्माला येतो आणि लोकशाहीचा गाभा असणाऱ्या सर्वसमावेशकतेच्या मुल्याचे हनन व्हायला सुरुवात होते .

**जातीवाद :**

भारतीय लोकशाही मध्ये जात हा घटक अत्यंत महत्वपूर्ण ठरलेला आहे. निवडणुकीमध्ये उमेदवारांच्या निवडीपासून ते मंत्रिमंडळातील स्थान निक्षिति पर्यन्त जात या घटकाने प्रभावशाली भूमिका बजावली असलयाचे आपल्याला दिसते. मतदान करत असताना उमेदवारांच्या गुणात्मक वैशिष्ट्ये लक्ष्यात न घेता त्याची जात प्राधान्याने पाहिली जाते त्यामूळे लोकशाही व्यवस्थेच्या कार्य क्षमतेवर परिणाम होते. जातीवादामुळे भारतीय संविधानाने सांगितलेले व्यक्तिमूल्य व व्यक्तीची प्रतिष्ठा राखली जात नाही . जातीवादी प्रवृत्ती ही समाजामध्ये अस्वस्थता व असहकार्य निर्माण करते व त्याचा थेट परिणाम भारतीय लोकशाही वरती होतो. त्यामुळे जातीवाद हे एक मोठे आव्हान भारतीय लोकशाहीसमोर आहे.

**प्रांतवाद :**

भारत हा एक खंडपराय देश आहे त्यामुळे प्रादेशिक समतोल साधण्याकरता घटक राज्यव्यवस्था निर्माण केली गेली. परंतु अजूनही प्रादेशिक असमतोल किंवा प्रांतवाद कमी झाला नाही. उत्तर भारत व दक्षिण भारत असा एक वाद कायम चर्चेत असल्याचे आपल्याला दिसते. उत्तर प्रदेश , बिहार येथील लोकाना रोजगारासाठी महाराष्ट्र , गुजरात , कर्नाटक अशा विकसित राज्यांमध्ये स्थलांतरित व्हावे लागते परंतु अश्या स्थलांतरित लोकाना विविध समस्याना तोंड द्यावे लागते . त्यांची प्रदेशावरून त्यांना भेदभावाचा सामाना करावा लागतो . कित्येक वेळेला त्यांच्या विरुद्ध हिंसा झाल्याच्या बातम्या आपण पाहतो. अशा वेळी प्रांतवादा मुळे भारताच्या एकता आणि अखंडतेला इजा पोहचते. प्रांतवादामुळे घटक राज्यांमध्ये विखरी स्पर्धा सुरू होते आणि अशा स्पर्धेतून राज्य एकमेकाना विरोध करू लागतात त्यामुळे लोकांच्या मूलभूत समस्या बाजूला राहून दोन राज्यांमधील प्रतिष्ठेच्या संघर्षाला सुरुवात होते त्यामुळे लोकशाही कमकुवत होते. प्रांतवादाच्या प्रवृत्तीमुळे विविध प्रश्नावरून वाद निर्माण होतात उदाहरणार्थ कर्नाटक व तमिळनाडू मध्ये असणार कावेरी नदी च्या पाणी वाटपाचा वाद. पाणी हे सर्वांसाठी मूलभूत गरज असली तरी माझ्या प्रांतातील लोकांचा त्यावर जास्त अधिकार आहे अशी भूमिका ही लोकशाहीला मारक ठरते.

**भाषावाद:**

भारतामध्ये भाषिक विविधता आहे. विविध राज्यांमध्ये असंख्य भाषा , बोली बोलल्या जातात. भारतामध्ये भाषेचा अभिमान बाळगला जातो त्यातून 'भाषिक श्रेष्ठत्व' या मूल्या ला बळ मिळते. आमचीच भाषा श्रेष्ठ अशी भूमिका घेतल्याने इतर भाषिक लोकांचा द्वेष केला जातो. ठराविक राज्यामध्ये ठराविक च भाषा बोलली पाहिजे असा आग्रह धरला जातो त्यामुळे भारतीय समाजातील विविधतेच्या संस्कृतीला आव्हान उभे राहते व कालांतराने लोकशाही व्यवस्थेपुढील आव्हान म्हणून भाषावाद विकसित होतो.

**दहशतवाद :**

धार्मिक संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाहीसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. समाजात धार्मिक तेढ वाढल्यामुळे सामाजिक स्थैर्य नाहीसे होते. दहशत वादामुळे लोकशाहीत प्राप्त होणाऱ्या मानवी अधिकारांचे हनन होते. समाजात अशांतता व असंतोष पासरविण्याचे काम दहशतवादी करत असतात. भारतीय लोकशाहीने निर्माण केलेली राजकीय व्यवस्था अस्थिर करून भारतामध्ये अराजकता माजवणे हा मुख्य उद्देश ठेवून दहशतवादी क्रिया करत असतात.दहशतवादासारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो.

**नक्षलवाद :**

नक्षलवाद ही भारतातील खूप मोठी समस्या आहे. भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. या नक्षलवादाने आता उग्र रूप धारण केले आहे. पण यातील शेतकरी-आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी होऊन सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, पोलीसदलांवर हल्ले करणे, यांसारख्या

मार्गांचा वापर नक्षलवादी गटांकडून केला जातो.नक्षलवादी गटाकडून आपल्याच नागरिकांच्या कत्तली करून सरकारविरोधी कृत्य करायला भाग पाडले जाते त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय अखंडतेला मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**भ्रष्टाचार :**

भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची समस्या दिसून येते. राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते. सरकारी कामांना लागणारा वेळ, सार्वजनिक सोई व सुविधांची घसरलेली गुणवत्ता, वेगवेगळे आर्थिक घोटाळे यांमुळे एकूण व्यवस्थेबद्दल अविश्वास आणि असमाधानाची भावना लोकांमध्येनिर्माण होते. निवडणूक प्रक्रियेमध्ये होणारा भ्रष्टाचार, बनावट मतदान, मतदारांना लाच देणे, पळवून नेणे यांसारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो. भ्रष्टाचारही देशाच्या सामाजिक , राजकीय ,धार्मिक दृष्टीने गंभीर समस्या आहे. या समस्येतून जो पर्यन्त आपण बाहेर पडणार नाही तो पर्यन्त देशाची सर्वंकष प्रगती होणे शक्य नाही. भारतात असे एकही क्षेत्र आढळत नाही जिथे भ्रष्टाचार नाही . भ्रष्टाचारांमुळे भारतीय लोकशाहीसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

राजकीय प्रक्रियेमध्ये गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना काही वेळा राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते. त्यामुळे राजकारणामध्ये पैसा आणि गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते. निवडणुकीच्या वेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो. सत्ताप्राप्तीच्या साठमारीत विचारप्रणालीच्या राजकारणाचे दारुण पराभव होते. राजकरणामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वाढत्या आलेखांमुळे त्याचा थेट परिणाम राजकारणातील लोक सहभागावर होताना दिसते . चांगले , कार्यक्षम लोक राजकरणांतील गुन्हेगारी मुळे सहभाग घेण्यास नकार देतात व सत्ता ही गुन्हेगारांच्या हातातील खेळणे बनते अशा वेळी लोकशाही समोर मोठे आव्हान उभे राहते.

**लोकांमधील जागरूकतेचा अभाव :**

लोकशाहीच्या यज्ञासाठी सामान्य जनता सतत जागरूक असणे आवश्यक आहे. अखंड जागरूकता ही लोकशाहीसाठी किंमती आहे. प्रतिनिधीक लोकशाहीमध्ये लोक प्रतिनिधींवर सतत लक्ष ठेवूनच त्यांना लोकमताच्या मार्गावर ठेवता येते. जागरूक लोकच असे नियंत्रण ठेऊ शकतील. तेच जर निष्क्रिय व बेफिकीर राहिले तर सत्तेची साधने जवळ असल्याने लोकप्रतिनिधी आपल्या हिताचेच रक्षण करतील हा लोकशाही व्यवस्थेपुढील महत्वाचा प्रश्न आहे मतदानाचा हक्क हे लोकांच्या हातात असलेले हत्यार आहे. त्याचा लोकांनी जागरूकपणे वापर करण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे. लोकांनाच लोकशाही विषयी आस्था नसेल किंवा ईर्षा नसेल तर लोकशाहीला भविष्य राहणार नाही.

**लोकसहभागाच्या मर्यादा :**

लोकसहभागावर लोकशाहीचा जीवंतपणा अवलंबून असतो लोकसहभाग वाढविण्यासाठी समाजात सर्व क्षेत्रात समानता असणे आवश्यक आहे. समाज रचनेत समतल रचना असल्यास सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रकियांचे क्षेत्र वाढू शकते आणि त्यांचा लोकांवर अधिक प्रभाव पडत असल्याने लोकांची लोकशाहीविषयी आस्था अधिक वाढेल.

**सामाजिक आव्हाने :**

वर उल्लेखलेल्या आव्हानांव्यतिरिक्त लोकशाहीसमोर काही सामाजिक आव्हानेही आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, दुष्काळ, साधनसंपत्तीचे असमान वितरण, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढती दरी, जातीयता इत्यादी सामाजिक प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. सामाजिक आर्थिक प्रश्नामुळे समाजात अस्वस्थता कायम आहे. लोकांचे मूलभूत प्रश्न ऐरणीवर असताना इतर गोष्टींकडे लक्ष विचलित केले जाते त्यामुळे लोकांमध्ये अन्यायाची भावना तयार होते.

**समारोप :**

भारत हा जगातील लोकशाही असलेला सर्वात मोठा देश आहे. भारतीय लोकशाही ही जगातील आदर्श लोकशाही म्हणून ओळखली जाते. लोकसंखेने जगात प्रथम क्रमांक असणारा व अनेक बाबतीत विविधता असलेला भारत हा एकमेव लोकशाहीप्रधान समाज आहे परंतु गेल्या ७५ वर्षांचे परीक्षण करून पाहिले तर भारतीय लोकशाहीत फार मोठा सकारात्मक व नकारात्मक बदल झालेला आपल्याला दिसून येईल. परंतु लोकशाहीची विकासात्मक वाटचाल ही चिरंतन होणारी प्रक्रिया आहे त्यामुळे सातत्याने त्याकडे लक्ष ठेवणे ,जागरूक राहणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही पूर्णत्वाने यशस्वी करायची असेल तर नागरिक म्हणून काही जबाबदाऱ्या पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील लोकशाही यशस्वी करण्यासाठी केवळ सरकार, प्रशासन व न्यायालयीन पातळीवर प्रयत्न होणे पुरेसे नाही. यासाठी सामाजिक व वैयक्तिक पातळीवर प्रत्येकानेच जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. शासकीय आणि प्रशासकीय पातळीवर अनेक उपक्रम राबवले जातात. भारतातील लोकशाही यशस्वी व्हायला हवी असेल तर सर्वच पातळ्यांवर नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. विशेषतः शासनव्यवहारांच्या पातळीवर तो वाढल्यास सार्वजनिक धोरणांचे स्वरूप बदलेल. संवादांतून त्यांची निर्मिती होईल. सत्तेवर न येऊ शकलेल्यांबरोबरही देवाण-घेवाण असणे लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे. समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आपल्या वैयक्तिक जीवनातही या मूल्यांचा आदर व जोपासना करायला हवी. आपण देशाचे एक जबाबदार नागरिक आहोत, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली तरच लोकशाही यशस्वी होईल. भारतातील सुजाण नागरिकांनी लोकशाहीवर दृढ विश्वास ठेवून, ती यशस्वी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभागी झाले पाहिजे कारण निवडणूकीच्या माध्यमातूनच भारतात लोकशाही राबविली जात आहे.

**संदर्भग्रंथ**

१)भोळे भा.ल.'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' आवृत्ती जुलै 2015 पिंपळपरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर

२) गुहा रामचंद्र अनुवाद साठे शारदा ' गांधीनंतरचा भारत' दुसरी आवृत्ती ऑगस्ट 2012 मॅजेस्टिक पब्लिकेशन हाऊस ठाणे.

३) ऑस्टिन ग्रॅनव्हील अनुवाद केळकर भारती 'भारताची राज्यघटना राष्ट्राची कोनशिला' डायमंड पब्लिकेशन. पूणे.

४) केतकर कुमार 'ज्वालामुखीच्या तोंडावर' सुधारित आवृत्ती 15 ऑगस्ट 2017 ग्रंथाली प्रकाशन माटुंगा.

५) कॉ. गुरव धनाजी 'लढून मिळवलेली लोकशाही टिकवण्यासाठी' प्रथम आवृत्ती 26 जानेवारी 2024 सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था कोल्हापूर.